श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय,यवतमाळ

शैक्षणिक सत्र-२०२६-२७

जागर आरोग्याचा-मुख्यमंत्री आरोग्य संवाद

शुक्रवार,दिनांक-१६/१०/२०२६

आजच्या महाविद्यायीन युवकांमध्ये सुदृढ आरोग्याबाबत जाणिवजागृती असणे अत्यंत आवश्यक आहे. युवकांची जीवनशैली निरोगी राहावी मानसिक आरोग्य उत्तम राहावे.व्यसनाधिनता,आत्महत्या यासारख्या समाजिक समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत जाणिवजागृती व्हावी तसेसच आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या अडचणी ,समस्या याबाबत व्यक्त व्हावेत या उद्देश्याने महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवार दिनांक १६/१०/२०२६ रोजी जागर आरोग्याचा-मुख्यमंत्री आरोग्य संवाद कार्यक्रमाअंतर्गत निरोगी युवक-निरोगी महाराष्ट्र ही संकल्पना साध्य करण्याच्या उद्देश्याने एक दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून मा.डॉ.अनिकेत धनगर,मनोविकार तज्ञ,मा.डॉ. केशव पागरूत,योगगुरू व सहयोगी प्राध्यापक,मा.डॉ. किरण धुर्वे,स्त्री रोग तज्ञ,मा.डॉ.सतिश पवार नोडल ऑफीसरव कार्यक्रम नियोजन समन्वयक मा.डॉ. अमर इमले,कार्यक्रम आयोजन व समन्वयक ,वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ उपस्थित होते.

महाविद्यालयीन युवकांनी आपले मानसिक आरोग्य चांगले राहावे यासाठी आपली जीवनशैली अत्यंत महत्वाची आहे. तणावरहित जीवनशैली,आहाराचे नियोजन,पोषक आहार महत्वाचा आहे.विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहावे,सुदृढ मानसिक आरोग्याच्या दृष्टीने युवकांनी आपल्या भावना,विचार समस्या,अडचणी मनातील गोष्टी इतरांना सांगाव्यात व्यक्त व्हावेत.असे महत्वपूर्ण मार्गदर्शन प्रमुख वक्ते मा.डॉ.अनिकेत धनगर यांनी विद्यार्थ्यांना केलेत.महाविद्यालयीन युवकांचे शारिरिक आणि मानसिक आरोग्य चांगले राहावे यासाठी विद्यार्थ्यांनी योग,प्राणायम,नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. आपल्या ताण-तणावावर नियंत्रण ठेवणे महत्वाचे आहे.असे प्रबोधनपर मार्गदर्शन प्रमुख वक्ते मा.डॉ. केशव पागरूत यांनी विद्यार्थ्यांना केले.विद्यार्थीनींच्या, महिलांच्या आरोग्यविषयक समस्या,स्वच्छता,महिलांचे आजार या विषयावर मा.डॉ किरण धुर्वे यांनी मार्गदर्शन केले.आजच्या युवकांमध्ये आत्मविश्वास असण्याची आवश्यकता आहे.विद्यार्थ्यांना आपले आयुष्य घडविण्याची संधी आहे ती संधी आपण ओळखावी.आजचा युवक म्हणजेच उद्याचा समाज घडविण्यात महत्वाची भूमिका पार पाडतो असे विचार प्रमुख वक्ते मा.डॉ अमर इमले यांनी व्यक्त केले.

जागर आरोग्याचा-मुख्यमंत्री आरोग्य संवाद या कार्यक्रमाअंतर्गत निरोगी युवक निरोगी महाराष्ट्र ही संकल्पना साध्य करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयीन युवकांमध्ये निरोगी जीवनशैली व्यसनमुक्त जीवन,सकारात्मक मानसिकता आणि दृष्टीकोन आत्महत्येपासून संरक्षण योग आणि प्राणायम सुदृढ आरोग्य याबाबत जाणिवजागृती असावी याबाबत माहिती प्रास्ताविक सादर करतांना मा.डॉ.सतिश पवार यांनी विद्यार्थ्यांना दिली.कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ.कल्पना एस.गोडघाटे राज्यशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा.डॉ.निलेश औतकर यांनी मानले.महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि महाविद्यालयीन विद्यार्थी बहूसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. जयंत चतूर यांचे मार्गदर्शन मिळाले.

श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय,यवतमाळ

शैक्षणिक सत्र-२०२६-२७

जागर आरोग्याचा-मुख्यमंत्री आरोग्य संवाद

शुक्रवार,दिनांक-१६/१०/२०२६







प्रमुख वक्ते मा.डॉ.किरण धुर्वे,मा.डॉ.अनिकेत धनगर,मा.डॉ.केशव पागरूत मार्गदर्शन करतांना

श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय,यवतमाळ

शैक्षणिक सत्र-२०२६-२७

जागर आरोग्याचा-मुख्यमंत्री आरोग्य संवाद

शुक्रवार,दिनांक-१६/१०/२०२६





